::महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बीड विभाग बीड ::

पोस्टाच्या दाखल्याने

जा.क्र.राप/विनि/बीड/आस्था-४/२५/ २५०४
विभागीय कार्यालय, राज्य परिवहन, बीड
दिनांक :- ३१.०५.२०२५

प्रति,

**१)डेप्युटी डायरेक्टर ऑफ ट्रेनिंग,**
वेस्टर्नरिजन, बोर्ड ऑफ अॅपरेन्टीशिप ट्रेनिंग,
न्यु अॅडमिनिस्ट्रेटीव्ह बिल्डींग, एटीआय कॅम्पस, सायन ट्रॉम्बे रोड **मुंबई-२२**

**२)उप प्रादेशिक सेवा योजन अधिकारी,**
विभागीयसेवा योजन माहिती व मार्गदर्शन केंद्र,
विद्यापिठ प्रांगण, **छत्रपती संभाजीनगर.**

**३)रोजगारव स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी,**
जिल्हारोजगारव स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, **बीड**

**४)जिल्हा व्यवसाय शिक्षणव प्रशिक्षण अधिकारी नगररोड, बीड**

**५) सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार ,**
मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगीकसूचना केंद्र, द्वारा आयटीआय बीड

**६) अंशकालीन प्राचार्य,** मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगीकसूचना केंद्र, द्वारा आयटीआय बीड

**विषय:**-सन - २०२५-२६ या सत्रातविविध व्यवसायात शिकाऊ उमेदवार भरती बाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, राज्य परिवहन, बीड विभागात सन-२०२५-२६ या सत्रात सोबत परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विविध व्यवसायात एकवर्षे प्रशिक्षणा करीता शिकाऊ उमेदवार भरती करण्यात येणार आहे.

१) सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये शिकाऊ उमेदवार म्हणुन विविध व्यवसायात भरावयाच्या जागा, विद्यावेतन, शैक्षणीक पात्रता, वय इत्यादी बाबींची माहिती दिलेली आहे.

२) रा.प.बीड विभागात विविध व्यवसायात शिकाऊ उमेदवार भरती करणेसाठी
(अ) पत्र क्र.जिकौविरोउमाकेंबी/रिक्तपदे/१२६३/२०१७,दि.२८.०९.२०१७ व
(ब)पत्र.क्र.विकौविरोवउमावमाकेऔ/रिक्तपदे/१३४५-४७/२०१७,दि.२६.०९.२०१७ नुसार महाराष्ट्र शासन,कौशल्य विकासव उद्योजकता विभागाच्या www.rojgar.mahaswayam.in या वेबपोर्टलवर या कार्यालयाचे Login I.D.मधुन Post Vacancy तसेच Manage Jobs & Response या Option मंधुन पात्र उमेदवारांची यादी घेण्यात येवुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

३) केंद्र शासनाने तयार केलेल्या एम.आय.एस.पोर्टलवर apprenticeship india.org या नविन वेबसाईटवर उमेदवारांने ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेली प्रत व त्यासोबत प्रशिक्षणार्थी भरती प्रक्रिया शुल्क म्हणुन रु. ५००/- + ९५/- = ५९५ (रु.पाचशे पंच्यानव) GEN & OBC प्रवर्गासाठी व रु २५०/- + ४५/- =२९५/- (रु.दोनशे पंच्यानव) मागासवर्गीयांसाठी (SC & ST) " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ "/ M.S.R.T.CORPORATION "Fund account payble at Beed " यांचे नावे काढलेला व जिल्हास्तरावरील बँकेत अधिदानीत होणारा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.प्रशिक्षणार्थी भरती प्रक्रिया शुल्क इतर कोणत्याही स्वरुपात स्विकारली जाणार नाही.डिमांड ड्राफ्टच्या मागे उमेदवाराने त्यांचे नाव व पत्ता आणि अर्ज केलेल्या पदाचे नाव ठळक अक्षरात लिहिणे अत्यंत आवश्यक आहे. उमेदवाराने पाठविलेले प्रशिक्षणार्थी भरती प्रक्रिया शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.अर्जासोबत डी डी सादर केला नाही किंवा रोख रक्कम पाठविली तर अर्ज बाद केला जाईल व तो विचारात घेतला जाणार नाही. मागासवर्गीय उमेदवारांनी (फक्त अ.जातव अ.जमात) सक्षम प्राधिका-यांनी दिलेला जातीचा दाखला,जोडणे आवश्यक आहे.

४) उमेदवारास जन्म तारखेचा दाखला तसेच संबंधीत व्यवसायाकरीता जी शैक्षणीक पात्रता विहित करण्यात आलेली आहे ती शैक्षणीक पात्रता पास असल्याची गुणपत्रिका किंवा प्रमाणपत्राच्या **साक्षांकित केलेल्या झेरॉक्स प्रत स्वतंत्र लिफाफ्यात टाकुन तो लिफाफा ऑनलाईनरजिस्ट्रेशनव**ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जा,**सोबत जोडणे अत्यावश्यक आहे.**

पान क्र.०२ वर

५) उमेदवारास एका पेक्षा जास्त पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र ऑनलाईन रजिस्ट्रेशन केल्याची प्रत व त्यासोबत स्वतंत्र प्रशिक्षणार्थी भरतीप्रक्रिया शुल्क अ.क्र ०३ मध्ये नमुद केल्या प्रमाणे भरणे आवश्यक आहे. (रु ५९५/- व रु २९५/- डिमांड ड्राफ्ट)

६) विविध व्यवसायाकरीता जी शैक्षणीक पात्रता व शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे व्यवसाय निहाय ट्रेड विहित करण्यात आलेले आहेत,त्या व्यवसाय निहाय परीक्षेत मिळालेल्या गुणानुक्रमानुसार एकास पाच (**१:५**) या प्रमाणात उमेदवारांना कागदपत्र छाननीस बोलाविण्यात येणार असल्याने संबंधीत व्यवसायाकरीता विहित केलेल्या शैक्षणीक पात्रतेची व शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची गुणपत्रिका व प्रमाणपत्र इत्यादीच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती उमेदवाराने ऑनलाईन रजिस्ट्रेशन व ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्याच्या प्रती सोबत जोडणे अत्यंत आवश्यक आहे,त्या शिवाय उमेदवाराचा शिकाऊ उमेदवारी प्रक्रीयेसाठी विचार केला जाणार नाही. तात्पर्य उमेदवाराने ऑनलाईन रजिस्ट्रेशन व ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्याची प्रत सादर केली म्हणजे त्यास कागदपत्र छाननीस बोलाविण्यात येईलच असे नव्हे.

७) विविध व्यवसायाकरीता एक वर्ष प्रशिक्षणासाठी शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने नियुक्तीची कार्यवाही करणे बंधनकारक आहे प्रशिक्षण कालावधी संपण्यापुर्वी उमेदवार शिकाऊ उमेदवारी सोडून गेल्यास अथवा गैरहजर राहिल्यास पाठयवेतनाची अदाकरण्यात आलेली रक्कम नुकसान भरपाई म्हणुन द्यावी लागेल सदर नुकसान भरपाई रक्कम न भरल्यास शिकाऊ उमेदवारी कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

८) विविध व्यवसायात शिकाऊ उमेदवार म्हणुन उमेदवाराची निवड झाल्यास सदरची नेमणुक ही सर्वस्वी शिकाऊ उमेदवार म्हणुन असेल, शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा एक वर्षाचा राहील व प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यानंतर त्यांना राज्य परिवहन महामंडळात सहाय्यक अथवा कोणत्याही पदात तात्पुरत्या अथवा कायमस्वरुपी सेवेसाठी कुठलाही आधार घेता येणार नाही याची त्यांनी कृपया नोंद घ्यावी.

९) मोटार अभियांत्रिकी पदविकाधारक (डिप्लोमाधारक) साठी पदविकाधारक उमेदवारांची देखील ऑनलाईन पध्दतीने नियुक्तीची कार्यवाही करणे बंधन कारक आहे.

१०)प्रशिक्षणार्थी कायदा १९६१ अंतर्गत उमेदवाराने या पुर्वी कोणत्याही कंपनी/संस्थेत प्रशिक्षण पुर्ण केलेले असल्यास त्यांनी अर्ज करु नये,त्यांच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

११) शिकाऊ उमेदवार भरतीसाठी मागासवर्गीयांचे प्रमाण विशेषत: अनु.जातव अनु.जमात यांना प्रत्येकी **१:१७** असे असल्याने मागासवर्गीय वबिगर मागासवर्गीय उमेदवारांचा समावेश करण्यात आला आहे.

१२) शिकाऊ उमेदवार निवडीकरिता अर्जसादर करण्याची अंतिम मुदत दि.१४०६.२०२५ पर्यंत आहे.पोस्टाने पाठविलेले अर्ज अपुर्ण किंवाविलंबाने मिळाल्यास सदरचा अर्जविचारातघेतले जाणार नाही.

१३) परिशिष्ट '' अ '' मध्ये दर्शविलेल्या व्यवसायातील पदाची संख्या बदलण्यासापेक्षा आहे.शिकाऊ उमेदवार पदी निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारांना रा.प.महामंडळाच्या अवश्यकतेनुसार व उपलब्ध होणा-या रिक्त जागे नुसार शिकाऊ उमेदवारी पदी नेमणुक देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१४) उमेदवारांनी विविध व्यवसायात शिकाऊ उमेदवार म्हणुन एक वर्षे प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बीड विभागाच्या Establishment Registration No E११११६२७०१५९९ वरती ऑनलाईन पध्दतीने Apply करण्याची अंतिम दि.१४-०६.२०२५ अशी आहे.

वरील प्रमाणे केंद्र शासनाने तयार केलेल्या एम.आय.एस.पोर्टलवर apprenticeship india.org या वेबसाईटवर उमेदवारांना ऑनलाईन रजिस्ट्रेशन व विहीत मुदतीत Apply करणे आवश्यक आहे.तसेच संबंधीत उमेदवारांना शिकाऊ उमेदवार म्हणुन भरतीची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने करणे बंधनकारक आहे.फक्त ऑनलाईन द्वारे Apply केलेल्या परंतु आवश्यक कागदपत्रे व शुल्क या कार्यालयास सादर न केलेल्या उमेदवारांचा सदर शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेत समावेश केला जाणार नाही.

**सोबत :-** परिशिष्ट ''अ''

आपला विश्वासू

विभाग नियंत्रक
राज्य परिवहन,बीड

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बीड विभाग, बीड

## परिशिष्ट- ''अ''

राज्य परिवहन, बीड विभागात सन - २०२५-२६ या सत्रातविविध व्यवसायात भरावयाच्या शिकाऊ उमेदवारांच्या जागेचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | शिकाऊ उमेदवारीचा व्यवसाय | जागा | शैक्षणीक पात्रता वइतर अटी |
|---|---|---|---|
| १ | यंत्र अभियांत्रीकी किंवा मोटार अभियांत्रिकी पदविकाधारक | ०२ | अ) उमेदवाराने अभियांत्रीकी महाविद्यालयातील यंत्र अभियांत्रीकी किंवा मोटार अभियांत्रीकी या शाखेतील पदवीकाधारण केलेली असावी.<br>ब) वयोमर्यादा - उमेदवाराचे वय दि.१४-०६.२०२५रोजी १८ वर्षा पेक्षा कमी व ३८ वर्षा पेक्षा जास्त नसावे.मागासवर्गीयांसाठी कमाल वयोपर्यादा ४३ वर्षे राहील.<br>क) प्रात्यक्षिक प्रशिक्षण कालावधी एकवर्षराहील.<br>ड)पाठयवेतन रु. ८०००/- दरमहा<br>इ)यंत्र अभियांत्रीकी किंवा मोटार अभियांत्रिकी पदविकाधारक या व्यवसाया करीता दि.१४-०६.२०२५रोजी ज्या उमेदवारांना सदर व्यवसाय परीक्षा पास होऊन तीन वर्षे पुर्ण किंवा त्या पेक्षा जास्त कालावधी झालेला असेल अशा उमेदवारांनी अर्ज करू नयेत. |
| | **विशेषसूचना :- यंत्र अभियांत्रीकी किंवा मोटार अभियांत्रिकी पदविकाधारक या व्यवसायाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज केलेल्या उमेदवारांची निवड व ऑनलाईन पध्दतीने नियुक्तीची कार्यवाही स्वतंत्ररित्या करण्यात येईल.(www.mhrdnats.gov.in)** | | |
| २ | मेकॅनिक मोटार व्हेईकल | ९० | अ) उमेदवाराने सरकारमान्य व्होकेशनल/आयटीआय मध्ये दोन वर्षाचा **मेकॅनिक (मोटार व्हेईकल)** या व्यवसायाचा कोर्स यशस्वीरित्या पुर्ण केलेला असावा.<br>ब) प्रशिक्षण कालावधी ०१ वर्षे<br>क) पाठ्यवेतन रु ८२५४.४० / रु.१०६१२.८० दरमहा. |
| ३ | शिटमेटल वर्कर | ६८ | अ) उमेदवाराने सरकारमान्य व्होकेशनल / आयटीआय मध्ये एक वर्षाचा **शिटमेटल वर्कर** या व्यवसायाचा कोर्स यशस्वीरित्या पुर्ण केलेला असावा.<br>ब) प्रशिक्षण कालावधी ०१ वर्षे<br>क) पाठ्यवेतन रु ८२५४.४० / रु.९४३३.६० दरमहा. |
| ४ | पेंटर (जनरल) | ०३ | अ) उमेदवाराने सरकारमान्य व्होकेशनल/आयटीआय मध्ये दोन वर्षाचा पेंटर (जनरल) या व्यवसायाचा कोर्स यशस्वीरित्या पुर्ण केलेला असावा.<br>ब) प्रशिक्षण कालावधी ०१ वर्षे<br>क) पाठ्यवेतन रु ८२५४.४० / रु.१०६१२.८० दरमहा. |
| ५ | वेल्डर (संधाता) गॅस अण्ड ईलेक्ट्रीकल | ०८ | अ) उमेदवाराने सरकार मान्य व्होकेशनल/ आयटीआय मध्ये एक वर्षाचा **वेल्डर** या व्यवसायाचा कोर्स यशस्वीरित्या पुर्ण केलेला असावा.<br>ब) प्रशिक्षण कालावधी ०१ वर्षे.<br>क) पाठयवेतन रु ८२५४.४० / रु.९४३३.६० दरमहा. |
| ६ | डिझेल मेकॅनिक | ३७ | अ) उमेदवाराने सरकार मान्य व्होकेशनल /आयटीआय मध्ये एक वर्षाचा **मेकॅनिक ( डिझेल )** या व्यवसायाचा कोर्स यशस्वीरित्या पुर्ण केलेला असावा.<br>ब) प्रशिक्षण कालावधी एकवर्ष<br>क) पाठयवेतन रु ८२५४.४० / रु.९४३३.६० दरमहा. |
| ७ | कार पेंटर | ०४ | अ) उमेदवाराने सरकार मान्य आयटीआय मध्ये एक वर्षाचा **कार पेंटर** या व्यवसायाचा कोर्स यशस्वीरित्या पुर्ण केलेला असावा.<br>ब) प्रशिक्षण कालावधी एकवर्ष<br>क) पाठयवेतन रु. ९४३३.६० दरमहा. |
| ८ | विजतंत्री | १० | अ) उमेदवाराने सरकार मान्य आयटीआय मध्ये दोन वर्षाचा **इलेक्ट्रीशियन** या व्यवसायाचा कोर्स यशस्वीरित्या पुर्ण केलेला असावा.<br>ब) प्रशिक्षण कालावधी एक वर्ष<br>क) पाठयवेतनरु.१०६१२.८० दरमहा. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | अपहोलस्टर | ०३ | अ) उमेदवाराने सरकार मान्य आयटीआय मध्ये एक वर्षाचा अपहोल्स्टर या व्यवसायाचा कोर्स यशस्वी रित्या पुर्ण केलेला असावा.<br>ब) प्रशिक्षण कालावधी एकवर्ष<br>क) पाठयवेतन रु. ९४३३.६० दरमहा. |
| १० | प्रशितण व वातानुकूलित यंत्रना | १० | अ) उमेदवाराने सरकार मान्य व्होकेशनल / आयटीआय मध्ये एक वर्षाचा **प्रशितण व वातानुकूलित यंत्रना** या व्यवसायाचा कोर्स यशस्वीरित्या पुर्ण केलेला असावा.<br>ब) प्रशिक्षण कालावधी एकवर्ष<br>क) पाठयवेतन रु ८२५४.४० / रु. ९४३३.६० दरमहा. |

विद्यावेतना बाबत :- ट्रेड शिकाऊ उमेदवारांचे पाठ्यवेतनात शासनाने ठरवुन दिलेल्या व रा.प. महामंडळाने स्विकृत केल्यानुसार बदल होण्याचा संभव आहे.

टिप:- मेकॅ.मोटार व्हेईकल, शिटमेटल , पेंटर (जनरल), वेल्डर,डिझेल मेकॅनिक,विजतंत्री,कार पेंटर,अपहोल्स्टर वप्रशितण व वातानुकूलित यंत्रना या व्यवसायाकरीता उमेदवाराचे वय दि.१४.०६.२०२५रोजी १४ वर्षा पेक्षा कमी व ३८ वर्षा पेक्षा जास्त नसावे.मागासवर्गीयांसाठी ०५ वर्षे शिथिलक्षम राहील.

विभाग नियंत्रक
राज्य परिवहन,बीड